**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य), पुणे**
**दूसरा व तिसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, कॅम्प, पुणे 1**

**दूरध्वनी क्र. 020-2613711** **Email ID:**dlrmah.mah@gov.in **Web site:** https://mahabhumi.gov.in

---

क्र.2023/रा.भू.अ.आ.का./तलाठी भरती/कावी/140/2023 दिनांक:11.07.2023

**--: प्रसिध्दी :--**

१) दै. लोकमत, पुणे आवृत्ती मध्ये दि. ०९/०७/२०२३ रोजी प्रसिद्ध वृत्त
२) दै. लोकमत, मुंबई आवृत्ती मध्ये दि. ०९/०७/२०२३ रोजी प्रसिद्ध वृत्त

संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील महसुल विभागातील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्याकामी दि. २६/०६/२०२३ रोजी वृत्तपत्रात तसेच संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात येवून पदभरती सुरू करण्यात आलेली आहे. शासनाकडील निर्देशांनुसार सर्व सदर पदभरतीकामी समन्वयाचे कामकाज या कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

दि. २६/०६/२०२३ पासुन सुरू झालेल्या तलाठी पदभरतीच्या अनुषंगाने उक्त क्र. १ व २ नुसार वृत्त प्रसिद्ध झालेले असून सदर वृत्तामध्ये तलाठी भरतीच्या अर्जात चुक दुरूस्तीची सुविधा नसल्याबाबत नमूद केलेले आहे. त्या अनुषंगाने सादर करण्यात येते की,

दि. २६/०६/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये तलाठी पदाकरीता आवश्यक अर्हता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज सादर करण्याची पद्धत, इत्यादीबाबत सविस्तर सुचना नमुद केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे अर्जदारास नोंदणी (Registration) प्रक्रियेवेळी तसेच प्रत्यक्ष अर्ज भरुन झाल्यानंतर सादर (Submit) करण्यापुर्वी त्यांनी भरलेल्या माहितीबाबत खात्री करण्याकामी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर अर्ज भरताना अर्जदाराने संपुर्ण जाहिरात व सविस्तर सुचना व्यवस्थितपणे वाचून समजून अर्जाबाबतची माहिती काळजीपुर्वक व अचुक भरणे अपेक्षित आहे. तसेच अर्जदाराने अर्जाबाबत भरलेली माहिती त्याने शुल्क भरुन अर्ज अंतिमरित्या सादर करेपर्यंत दुरूस्त करण्याची सुविधा उपलब्ध आहे. अर्जदाराने शुल्क भरून अर्ज सादर (Submit) केल्यानंतर त्याला अर्जामध्ये कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही. त्याबाबत संकेतस्थळावर तसेच जाहिरातीमध्ये नमुद केलेले आहे.

XXX/- सही
**(आनंद रायते) भाप्रसे**
**अप्पर जमाबंदी आयुक्त आणि**
**अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख,पुणे.**